महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील "वैद्यकीय अधिकारी गट-अ" यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः परिवि-२०२४/प्र.क्र.२०६ /सेवा-३

दहावा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय,मुंबई- ४०० ००१.
तारीख: १७ मे, २०२४.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/आठ, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६.
२) शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः परिवि-२७१८/प्र.क्र.२/आठ, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दिनांक ३० डिसेंबर १९८७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील "वैद्यकीय अधिकारी गट-अ" या पदावर दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीकरीता सदर शासन आदेशात असलेल्या खालील तक्त्यात नमूद वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गठित स्वतंत्र मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार "वैद्यकीय अधिकारी गट-अ" या पदावर शासन सेवेत प्रथम नियुक्तीने करण्यात आलेल्या आहेत.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा येथे नमूद शासन निर्णयान्वये शासन सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आल्या असून, वैद्यकीय अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या पदावर पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांचा दोन वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असल्याने या अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता सदर परिच्छेदात नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील "वैद्यकीय अधिकारी गट-अ" यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी समाधानकारकरित्या पूर्ण केलेल्या असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी या परिच्छेदातील तक्त्यात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्र.५ मध्ये नमूद दिनांकास (म. नं.)

समाप्त करण्यात येत आहे. तसेच त्यांची सेवा नियमितपणे पुढे चालू ठेवण्याचा दिनांक (म. पू.) स्तंभ क्र.७ मध्ये नमूद करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव	कार्यालय	वै.अ. पदावरील रुजू झाल्याचा दिनांक	परिविक्षाधीन कालावधी समाप्त केल्याचा दिनांक	परिविक्षाधीन कालावधी पुढे ढकलल्याची कारणे	वै.अ. पदावरील सेवा नियमितपणे पुढे चालू ठेवण्याचा दिनांक
१	२	३	४	५	६	७
१	डॉ. राजेंद्र चिंतामण बोरसे	उपजिल्हा रुग्णालय चांदवड, जि. नाशिक	दि.२१.०५.२०१५	दि.२०.०५.२०१७	निरंक	दि.२१.०५.२०१७
२	डॉ. सुहास सदाशिव सोनावणे	ग्रामीण रुग्णालय साक्री, जि. धुळे	दि.१८.०२.२००८	दि.१०.०३.२०१०	२१ दिवस रजा	दि.११.०३.२०१०
३	डॉ. श्याम सुरेश गावंडे	विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती.	दि.०९.०७.२०२१	दि.२६.०७.२०२३	१८ दिवस रजा	दि.२७.०७.२०२३
४	डॉ. वासंती अमोल चव्हाण	वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, अंबाजोगाई जि. बीड	दि.०५.०८.२०१९	दि.०४.०८.२०२१	निरंक	दि.०५.०८.२०२१
५	डॉ. कमलाकर उलाजी जाधव	प्रा. आ. कें. पळसण, ता. सुरगाणा जि. नाशिक	दि.०५.०१.२०१९	दि.०४.०१.२०२१	निरंक	दि.०५.०१.२०२१
६	डॉ. आशिष गोपाल पाठक	प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे	दि.०१.११.२०१४	दि.२०.११.२०१६	२० दिवस रजा	दि.२१.११.२०१६
७	डॉ. शुभांगी जालिंदर पैठणे	प्रा. आ. कें. कुंठेफळ, ता. आष्टी जि. बीड	दि.०७.०८.२०१९	दि.२१.०४.२०२२	२५८ दिवस रजा	दि.२२.०४.२०२२
८	डॉ. योगेश कारभारी कर्डीले	प्रा. आ. कें. जेऊर, ता. जि. अहमदनगर	दि.२०.१२.२०१७	दि.०८.०३.२०२०	८० दिवस रजा	दि.०९.०३.२०२०
९	डॉ. राजू बाबूराव सुनेवाड	प्रा. आ. कें. चांडोळा, ता. मुखेड जि. नांदेड	दि.१६.०७.२०१५	दि.१५.०७.२०१७	निरंक	दि.१६.०७.२०१७
१०	डॉ. शेख आसीफ इक्बाल निजाम	जिल्हा रुग्णालय, जळगांव	दि.१२.०५.२०१५	दि.१९.०८.२०१७	१०० दिवस रजा	दि.२०.०८.२०१७
११	डॉ. विनोद मनोहर चव्हाण	ग्रामीण रुग्णालय, इगतपूरी, जि. नाशिक	दि.२५.०२.२००९	दि.२४.०२.२०११	निरंक	दि.२५.०२.२०११
१२	डॉ. आनंद यशवंत सुर्वे	प्रा. आ. कें. काजीसांगवी, ता. चांदवड जि. नाशिक	दि.१४.०५.२०१५	दि.१३.०५.२०१७	निरंक	दि.१४.०५.२०१७

१३	डॉ. पुजा रावसाहेब टोळे	विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती	दि.१७.०९.२०२१	दि.१६.०९.२०२३	निरंक	दि.१७.०९.२०२३
१४	डॉ. विक्रम बाळकृष्ण कटरे	प्रा. आ. कें. भानकुर जि. गोंदिया	दि.३०.०४.२०१५	दि.०६.०६.२०१७	३८ दिवस रजा	दि.०७.०६.२०१७
१५	डॉ. संदिप कुमार भागवत सुरुशे	प्रा. आ. कें. साखरखेर्डा, ता. सिंदखेडराजा जि. बुलडाणा	दि.१२.१२.२०१७	दि.११.१२.२०१९	निरंक	दि.१२.१२.२०१९
१६	डॉ. राहूल बाळकृष्ण गेठे	उपजिल्हा रुग्णालय शहापूर, ता. शहापूर जि. ठाणे	दि.०६.०८.२०१९	दि.०५.०८.२०२१	निरंक	दि.०६.०८.२०२१
१७	डॉ. शिवदास पांडुरंग सरोदे	प्रा. आ. कें. शिवणा, ता. सिल्लोड जि. औरंगाबाद	दि.२२.०७.२०१४	दि.१७.०८.२०१६	२७ दिवस रजा	दि.१८.०८.२०१६
१८	डॉ. शुभांगी श्रीहरी घोळवे	प्रा. आ. कें. सावळज, ता. तासगांव जि. सांगली	दि.१७.०८.२०११	दि.२१.०८.२०१३	०५ दिवस रजा	दि.२२.०८.२०१३
१९	डॉ. प्रविण शिवदास शिंदे	उपजिल्हा रुग्णालय अकलुज, जि. सोलापूर	दि.२३.०४.२०१४	दि.२२.०४.२०१६	निरंक	दि.२३.०४.२०१६
२०	डॉ. आकिब रफीक पटेल	प्रा. आ. कें. हातगांव, ता. शेवगांव जि. अहमदनगर	दि.२६.११.२०१५	दि.२२.०१.२०१८	५८ दिवस रजा	दि.२३.०१.२०१८
२१	डॉ. रविशंकर रामराव होनराव	प्रा. आ. कें. धसई, ता. मुरबाड, जि. ठाणे	दि.२६.०४.२०१४	दि.२५.०४.२०१६	निरंक	दि.२६.०४.२०१६
२२	डॉ. रोहन आनंदा थोरात	जिल्हा रुग्णालय, नंदुरबार	दि.२१.०२.२०११	दि.२०.०२.२०१३	निरंक	दि.२१.०२.२०१३

३. आयुक्त, आरोग्य सेवा व कु.क.तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई यांना कळविण्यात येते की, उक्त वैद्यकीय अधिकारी यांच्या पुढील वेतनवाढी नियमानुसार व विहित तरतुदीनुसार मुक्त करण्याच्या अनुषंगाने तात्काळ उचित कार्यवाही करावी.

१. उक्त तक्त्यातील डॉ. आनंद यशवंत सुर्वे हे भाषा संचालनालयाची मराठी भाषा परीक्षा दि.०९.०१.२०२२ रोजी उत्तीर्ण झाले असल्याने त्यांना मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून दि.०९.०१.२०२२ पासून सूट मिळालेली आहे. तथापि, उपरोक्त तक्त्यात त्यांचा परिविक्षा

कालावधी दि.१३.०५.२०१७ रोजी समाप्त होवून स्तंभ ७ येथे नमूद केल्यानुसार त्यांची वैद्यकीय अधिकारी या पदावरील सेवा नियमितरित्या जरी दि.१४.०५.२०१७ पासून पुढे चालू होत असली तरी, त्यांच्या वेतनवाढी दि.०९.०१.२०२२ पर्यंत रोखून त्या दिनांकापासून त्यांना वेतनवाढी देय होईल. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनवाढी वाचा क्र.३ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रोखल्यांनतर तद्नंतर भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यास सूट मिळाल्याच्या दिनांकापासून सदर अधिकाऱ्यास वेतनवाढी देय झाल्यांनतर त्यापुढील सर्व वेतनवाढी त्यांची कोणतीही वेतनवाढ रोखून धरण्यात आली नव्हती असे मानून त्यांना मिळतील. मात्र वेतनवाढ रोखल्यामुळे त्यांना ज्या प्रत्यक्ष वेतनास मुकावे लागले त्याची थकबाकी मिळण्याचा हक्क त्यांना राहणार नाही.

२. उक्त तक्त्यातील डॉ. आशिष गोपाल पाठक हे भाषा संचालनालयाची मराठी भाषा परीक्षा दि.०९.०१.२०२२ रोजी उत्तीर्ण झाले असल्याने त्यांना मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून दि. ०९.०१.२०२२ पासून सूट मिळालेली आहे. तथापि, उपरोक्त तक्त्यात त्यांचा परिविक्षा कालावधी दि.२०.११.२०१६ रोजी समाप्त होवून स्तंभ ७ येथे नमूद केल्यानुसार त्यांची वैद्यकीय अधिकारी या पदावरील सेवानियमितरित्या जरी दि.२१.११.२०१६ पासून पुढे चालू होत असली तरी, त्यांच्या वेतनवाढी दि.०९.०१.२०२२ पर्यंत रोखून त्या दिनांकापासून त्यांना वेतनवाढी देय होईल. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनवाढी वाचा क्र. ३ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रोखल्यांनतर तद्नंतर भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यास सूट मिळाल्याच्या दिनांकापासून सदर अधिकाऱ्यास वेतनवाढी देय झाल्यांनतर त्यापुढील सर्व वेतनवाढी त्यांची कोणतीही वेतनवाढ रोखून धरण्यात आली नव्हती असे मानून त्यांना मिळतील. मात्र वेतनवाढ रोखल्यामुळे त्यांना ज्या प्रत्यक्ष वेतनास मुकावे लागले त्याची थकबाकी मिळण्याचा हक्क त्यांना राहणार नाही.

४. सदर शासन आदेश वाचा येथे नमूद शासन निर्णय/शुध्दीपत्रक यांमधील तरतुदींन्वये व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय परिवी-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०५१७१४३६३६९०१७ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH SARDAR JADHAV

Digitally signed by AVINASH SARDAR JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=77e749a5820964d03e94305adeb0ee2ffb2c5f02efc5b019e8b49dc59175a25c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AA8FDCAA7AE61AB4BED501E19D794BD7197874F2989B98780B1607ADCBDFE844, cn=AVINASH SARDAR JADHAV
Date: 2024.05.17 14:55:23 +05'30'

(अ.स.जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, आरोग्य सेवा व कु.क.तथा संचालक, रा.आ.अ, आरोग्य भवन,मुंबई.
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- २, महाराष्ट्र, नागपूर.
४) महालेखापाल, लेखापरीक्षा- १, महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल, लेखापरीक्षा- २, महाराष्ट्र, नागपूर.
६) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई
७) उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)
८)जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
९)जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१०)जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
११) संबंधित वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्यामार्फत.
१२) निवडनस्ती (कार्यासन सेवा-३)